महाराष्ट्र जनशक्ती | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १०३ वा | दिनांक : १७/०१/२०२५ | वार : शुक्रवार

## निष्क्रीय फडणविसांनी गृहमंत्रीपद सोडावे : नाना पटोले



**मुंबई** : पद्मश्री पुरस्काराने सन्मानीत सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेता सैफ अली खान यांच्यावर झालेला खुनी हल्ला महाराष्ट्राच्या कायदा सुव्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगणारा आहे. मुंबईतील वांद्रे या वर्दळीच्या भागात अशा घटना होत असतील तर मुंबईत कोण सुरक्षित आहे? मुंबई, पुणे, बीड, परभणी, नागपूरमधील वाढत्या गुन्हेगारी घटना पाहता राज्यात गृहमंत्री आहेत का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

भाजप युती सरकारमध्ये गुंडाराज फोफावले असून सैफ अली खान वरील हल्ला हे गुंडांनी महाराष्ट्राच्या कायदा सुव्यवस्था दिलेले आव्हान आहे. महायुती सरकारच्या काळात गुंडाराज फोफावले असून हे सरकारचे अपयश आहे, असा घणाघाती हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

राज्यातील कायदा सुव्यवस्थेच्या प्रश्नावर भाजप सरकारचा समाचार घेताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, भाजप सरकारमध्ये गुन्हेगारांचे मनोबल वाढले असून मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह त्यांच्या लाडक्या पोलिस महासंचालक अत्यंत निष्क्रिय आहेत. मुंबईला दोन पोलिस आयुक्त आहेत तरीही ना राज्यात कायदा सुव्यवस्था आहे ना मुंबईत. बीडमधील संघटीत गुन्हेगारी व त्याला असलेले राजकीय आशिर्वाद, परभणीत पोलिस कोठडीत मृत्यू, वांद्रात माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची गोळ्या घालून हत्या, अभिनेता सलमान खानच्या घरावर गोळीबार या गंभीर घटना आहेत. गृहमंत्री पद सांभाळण्यात फडणवीस अपयशी ठरले आहेत. राज्यात सोलिब्रिटी, सत्ताधारी पक्षाचे नेते, सर्वसामान्य जनता कोणीही सुरक्षित नाही.

गुन्हेगारांना सोडणार नाही, कठोर शिक्षा करू अशा विधानांचे पालुपद सोडून काहीतरी कठोर कारवाई करण्याची हिम्मत मुख्यमंत्र्यांनी दाखवावी. राज्यात गुन्हेगारी वाढत असताना फडणवीस गंभीर नसल्याचे दिसत आहे. अभिनेता सैफ अली खानवर जीवघेणा हल्ला झाल्यानंतर त्याची गंभीर दखल घेण्याऐवजी मुख्यमंत्री फडणवीस चित्रपटांच्या प्रमोशनमध्ये व्यस्त होते. असा निष्क्रीय व कमजोर गृहमंत्री महाराष्ट्राला लाभले हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

## आका दर महिन्याला ठराविक लोकांना पैसे द्यायचा : आमदार सुरेश धस



**बीड** : संतोष देशमुख हत्या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांच्या जवळचे असलेले वाल्मीक कराड यांच्यावर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. तसेच राष्ट्रवादी पक्षात देखील आता दबाव वाढला असल्याचे दिसून येत आहे. यावर भाजप आमदार सुरेश धस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

आमदार सुरेश धस म्हणाले, राष्ट्रवादी कॉंग्रेसवर दबाव वाढला आहे की कमी झाला आहे की दबावच नाही हे मी कसे सांगणार? मी भाजपचा माणूस आहे. परंतु त्यांनी जो काही विचार करायचा आहे तो त्यांनी करावा. राष्ट्रीय अध्यक्ष आहेत, प्रफुल्ल पटेल आहेत, भुजबळ साहेब आहेत, तटकरे साहेब आहेत या वरिष्ठ नेते मंडळी जे आहेत आहेत त्यांनी काय तो निर्णय करावा, अशी प्रतिक्रिया आमदार सुरेश धस यांनी दिली आहे.

धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावर प्रश्न विचारला असता आमदार सुरेश धस म्हणाले, माझ्या सारख्या पामराने राष्ट्रवादीतल्या अंतर्गत प्रश्नाच्या बाबतीत काय बोलावे. पुढे बोलताना धस म्हणाले, एखादी जरी त्रुटी पोलिसांकडून राहिली तर न्यायालयीन चौकशीमध्ये कसल्याही प्रकारची त्रुटी राहू शकत नाही. म्हणजे यात जे कोणी आका, बाका, मामा, चाचा जे कोणी लोक आहेत याच्यातले, ज्यांनी ज्यांनी संतोष देशमुख यांना अतिशय क्रूरपणे मारलेले आहे ते सगळेच्या सगळे फासावर जाण्यासाठी निश्चितच न्यायालयीन चौकशीचा या ठिकाणी फायदा होणार आहे. आदरणीय न्यायालयाने ही चौकशी लवकरात लवकर पूर्ण करावी अशी माझी विनंती आहे.

आमदार सुरेश धस म्हणाले, आका जो आहे हा सोपा आका नाही. हा १७-१७ मोबाईल वापरत होता. आता तुम्ही नावीन्यपूर्ण योजना सांगितली की अमेरिकेतून धमकी देत होता, तेही करत असेल. आका काय काय नाही करू शकत? आकाचा बाका दर महिन्याला ठराविक लोकांना काहीतरी ठराविक रक्कम पाठवत होता. ठराविक शब्द वापरतो मी, ठराविक लोकांना आता तुमचे तुम्ही समजून जा.

वाल्मीक कराडच्या पत्नीने देखील आमदार सुरेश धस यांच्यावर काही आरोप केले होते. यावर प्रतिक्रिया देताना धस म्हणाले, हे बघा ती माझी भगिनी आहे. त्यांनी केलेल्या आरोपांवर मी काही बोलू शकत नाही. कुठल्याही पुरुषाने येऊन माझ्यावर बोलावे. माझ्याविरोधात कुठेच काही व्हिडिओ वगैरे सापडू शकत नाही, धुतल्या तांदळासारखे आयुष्य जगलो आहे मी, माझा काही व्हिडिओ वगैरे सापडणार नाही.

खंडणी प्रकरणात संतोष देशमुख आडवा आला म्हणूनच त्याचा खून केला, आता ही मी नाही म्हणत एसआयटी सांगत आहे. त्यामुळे ते जे एसआयटी सांगते ते खरे सांगेल न, आम्ही राजकारणी काही पण बोलू. पण एसआयटी जे सांगते जो अर्ज आहे कालचा त्यातही एसआयटी हेच म्हणते की खंडणीच्या आडवा आला म्हणून संतोष देशमुखला संपवले.




## अजित पवारांना जे कळते ते कुणालाच कळत नाही : माणिकराव कोकाटे

**पुणे** : उपमुख्यमंत्री अजित पवार यांना जे कळते ते कुणालाही कळत नाही, असे विधान राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी गुरुवारी येथे आयोजित एका कार्यक्रमात बोलताना केले. यावेळी त्यांनी अजित पवारांच्या पहाटेच्या शपथविधीचीही आठवण काढली.

लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीत शरद पवार व अजित पवारांनी एकमेकांविरोधात प्रचार केला. तसेच एकमेकांवर टीका टिप्पणीही केली. यामुळे राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांतील वातावरण तापले होते. त्यानंतर आज बारामती येथील कृषीक कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने शरद पवार, अजित पवार, सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार आदी सर्वजण एका व्यासपीठावर आले. यावेळी मंत्री पंकजा मुंडे व कृषिमंत्री माणिकराव कोकाटेही उपस्थित होते.

यावेळी बोलताना माणिकराव कोकाटे यांनी अजित पवारांना जे कळते ते कुणालाही कळत नसल्याचे विधान केले. ते म्हणाले, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मला राज्याच्या कृषी खात्याची जबाबदारी दिली. पण मला ही जबाबदारी मिळेल अशी अजिबात अपेक्षा नव्हती. मात्र अजित पवारांना जे कळते ते कुणालाच कळत नाही असे मला वाटत आहे. कारण, ते एक हुशार व्यक्तिमत्त्व आहेत. बारामतीत असताना येथील रस्ते पाहून मला सिंगापूरमध्ये आल्यासारखे वाटत आहे.

माणिकराव कोकाटे पुढे म्हणाले, मी माझ्या आयुष्यात प्रथमच सकाळी उठून कामाला लागण्याचा पहिला दिवस पाहत आहे. मी उशिरा उठतो हे अजित पवारांना माहिती आहे. त्यामुळे त्यांनी कालच मला सांगितले की, उद्याच्या दिवस तसदी घ्यावी लागेल. ते मी अजित पवारांना सांगितले की, जेव्हा गरज असते तेव्हा मी तुमच्या खांद्याला खांदा लावून कुठेही उपस्थित असतो. पहाटेचा शपथविधी आठवा. त्यावेळी मी तुच्या पाठीमागेच उभा होतो, असे ते म्हणाले. त्यांच्या या विधानामुळे कार्यक्रमात एकच हशा पिकला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १७ जानेवारी २०२५


## डॉ.सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक कला महाविद्यालयात चित्रपट महोत्सव साजरा




**छत्रपती संभाजीनगर** डॉ.सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक कला महाविद्यालय अंतर्गत मानसशास्त्र विभागातर्फे दि.१३ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ या दरम्यान चित्रपट महोत्सव साजरा करण्यात आला. हा चित्रपट महोत्सव दरवर्षी वेगवेगळ्या संकल्पनेवर आधारित असतो. हा महोत्सव सादर करण्याचे हे चौथे वर्ष आहे व यावर्षीची संकल्पना Genration to Genration, Hand in Hand (जनरेशन टू जनरेशन) ही होती. या थीमच्या माध्यमातून एखादा चांगला विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजवावा हे या महोत्सवाचा उद्दिष्ट होते.

या चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन दि.१३ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनिता बाजपेयी यांच्या हस्ते ऑनलाईन करण्यात आले. या उद्घाटनाच्या दिवशीचे वैशिष्ट्य म्हणजे या दिवशी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी आजी-आजोबा, बाबा-आई, मुलगा- मुलगी या वेशभूषा परिधान करत प्रेक्षकांची मने जिंकली व संकल्पना विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचा प्रयत्न केला.

या चित्रपट महोत्सवात तिकीट प्लीज, वारसा, वो पल, मॉम के ड्रीम्स, रविवार सकाळ, नात्यातील गोडवा हे लघुचित्रपट दाखविण्यात आले. या लघुपटाच्या माध्यमातून एकमेकांचा आदर, सन्मान, समजून घेणे, सहकार्य, सुसंवाद ही मूल्य रुजविण्यात आली. दि.१५ जानेवारी २०२५ रोजी चित्रपटावर आधारित विद्यार्थ्यांमध्ये चर्चा घेण्यात आली. यात विद्यार्थ्यांचे वेगवेगळे समूह तयार करून त्यांना आपली मते मांडण्यासाठी प्रोत्साहित करून व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

या चर्चा दरम्यान "दोन पिढ्यांमध्ये संवाद हा असायला हवा,धावत्या धकाधकीच्या जीवनशैलीत एकमेकांना सांभाळत नाते जपायला हवे, जनरेशन गॅप आहे म्हणून सोडून देण्यापेक्षा जुन्या पिढीने तंत्रज्ञान शिकायला हवे व नवीन पिढीने आपल्या वरिष्ठांचा मान राखायला हवा व त्यांना वेळ द्यायला हवा, अशी संस्कारांची मूल्य जेव्हा रुजवली जाते तेव्हा वृद्धाश्रमांची संख्या कमी होईल," असा संवादाचा सूर गवसला.

या महोत्सवात या थीमवर आधारित व्हिडिओ मेकिंग स्पर्धा घेण्यात आली या स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी generation to generation hand in hand या थीमवर वेगवेगळे व्हिडिओ तयार केले. सगळे व्हिडिओ विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले.

या चित्रपट महोत्सवाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे उद्घाटनाचा संपूर्ण कार्यक्रम ऑनलाईन आधीच शूटिंग घेऊन दाखविण्यात आला. उद्घाटन देखील ऑनलाईन व्हिडिओच्या माध्यमातून करण्यात आले.

या चित्रपट महोत्सवाला विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. यात महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनिता बाजपेयी, मानसशास्त्र विभाग प्रमुख प्रो. डॉ. रजनी सेनाड, डॉ.सविता मनोहर व डॉ.अंजली पंडित यांनी महोत्सव यशस्वी होण्यासाठी अनमोल सहकार्य केले.

## डॉ. बाळासाहेब लिहिणार फुले-शाहू-आंबेडकरी साहित्य रत्न पुरस्काराने सन्मानित



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेचे संस्थापक उपाध्यक्ष डॉ बाळासाहेब लिहिणार यांना फुले शाहू आंबेडकरी साहित्य रत्न पुरस्कार देऊन सन्मानित केले.

डॉ. बाबासाहेब ही परिषद स्थापन केली ती काही ध्येय धोरण समोर ठेवून केली होती, फुले शाहू आंबेडकर विचार वाडी तांड्यावर पोहचवीण्याचे काम करायचे या विचारातून ही परिषद १९१० मध्ये स्थापन झाली तेव्हापासून सतत परिवर्तन विचार घेऊन डॉ. बाळासाहेब लिहिणार यांचे कार्य चालू आहे. काही घातक रूढी परंपरा नाकारून काळ आणि वेळेप्रमाणे माणसानी बदलले पहिजे विज्ञान युगाचा परिणाम झाला पाहिजे म्हणून अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य डॉ. बाळासाहेब लिहिणार करतात.

राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड येथे डॉ. बाळासाहेब लिहिणार बावीस वर्षांपासून मराठी भाषा विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहे.आज पर्यंत त्यांचे अकरा विद्यार्थी Ph.D पदवी प्राप्त झाले असून दोन विद्यार्थ्यांचे काम अंतिम टप्यात आहे.

पटाया इंडियन असोसिएशन व सोनवणे फाउंडेशन यांनी त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून थायलंड येथे झालेल्या फुले शाहू आंबेडकरी साहित्य संमेलनात फुले शाहू आंबेडकरी साहित्य संमेलनात फुले शाहू आंबेडकर साहित्य रत्न पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. यानिमित्त त्यांचे डॉ. ऋषिकेश कांबळे, प्राचार्य डॉ सदाशिव मुळे प्रा. दिलीप महालिंगे, प्राचार्य डॉ. हसन इनामदार, डॉ. युवराज धबडगे डॉ. मोहन सौदर्य, डॉ. बाळासाहेब गायकवाड डॉ. शंकर वाघमारे, प्राचार्य प्रशांत वनजे, डॉ. अरुण कोळी, डॉ. कालिदास फड आदिनी अभिनंदन केले


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## वन्यजीवांच्या अधिवासास उपयोगी "देशी बास" या नक्षत्र वृक्षाचे रोपण



**कन्नड (अरुण थोरात):** संक्रातीला पुनर्वसू नक्षत्र सुरु होते. व सूर्य मकर राशीत प्रवेश करतो. या दिनी या नक्षत्राचा आराध्य वृक्ष असलेल्या " देशी बास" या वनस्पतीचे राज्यभर वृक्ष संवर्धन करणारे सिल्लोड येथील अभिनव प्रतिष्ठानचे डॉ.संतोष पाटील यांनी संक्राती उत्सवाच्या निमित्ताने अजिंठा डोंगरात वसई जवळील वाघूरनदी काठी असलेल्या गंगेश्वर मंदिर परिसरात व नदी काठच्या डोंगरात १०० रोपे लावली व काही रोपांचे वाण ही भाविकांना दिले.

या रोपांचे पालकत्व पुजारी भिकन महाराज यांनी स्वीकारले आहे. यावेळी भाऊ साहेब निकोद, रामेश्वर जंजाळ, पत्रकार गणेश घोडे, भिकन सोनोने, कृष्णा काळे आदिची उपस्थिती होती.

संस्कृती आणी पर्यावरण:- बास म्हणजे बांबू यास संक्राती मध्ये महत्व आहे, कारण संक्राती पासुन सूर्य अधिक तळपतो तर बांबू शीतल व हरीत आहे. या वर्षी संक्राती चे वाहन वाघ असून वाघ, बिबट्या हे दिवसा बांबू बेटात निवारा घेतात. अनेक पक्षी बांबू वर विसावा घेतात. तितर, बटेर, साप, सायाळ यांना अधिवासा साठी बांबू बेट आवडते.

इको फ्रेंडली बांबू:- कोणत्याही झाडापेक्षा बांबू वातावरणातील कार्बन वायू अधिक शोषतो.ग्रीन हाऊस वायू कमी करून प्रदूषके ही शोषून घेतो.सहजीवनाचे सुंदर उदाहरण म्हणजे बांबू वनस्पती यात बीटल्स जातींचे भुंगे छिद्र करतात. त्यात भुंगे काही काळ वस्ती करून उडून जातात व त्याच छिद्रातून वेस्पर लेसर बांबू बॅट नावाचे छोटेसे ५ सेमी लांबीचे वटवाघूळ प्रवेश करून त्यात प्रजनन करते. जैववीधतेसाठी व संस्कृती संवर्धन म्हणून रोपण केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १७ जानेवारी २०२५


## कन्नड तालुक्यात फेरफार अदालतीत शेकडो प्रकरणे निकाली




**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड तालुक्यातीत मंडळ निहाय फेरफार अदालतीचे दि.१५ जानेवारी रोजी आयोजन करण्यात आले होते. यात वादग्रस्त प्रकरणे वगळता, ३४५ फेरफार निकाली काढण्यात आले.

यात कन्नड मंडळ ४२, करंजखेड १०, नागद ०९, नाचणवेल ५२, पिशोर ४०, हतनूर ३९, चिकलठाण १४, चिंचोली लिबाजी २२ देवगाव रंगारी ०८, चापानेर १०९ असे एकुण ३४५ फेरफार निकाली निघालेत. तर सात बारा दुरुस्ती ६७, रस्ते विषयक २८, शिधापत्रिका ३१, इतर ९६ असे एकुण २२२ नविन अर्ज प्राप्त झालेत. यावरती सुनावणी घेऊन २० दिवसांत निकाली काढण्यात येतील अशी माहिती तहसीलदार विद्याचण कडवकर यांनी दिली. उपस्थित शेतकर्यांना मंजूर फेरफार चे सात बारा, विद्यार्थ्यांना दाखले वाटप करण्यात आले.

उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसीलदार श्री कडवकर यांनी नाचणवेल येथे भेट देऊन मंडळातील शेतकरी, सरपंचांशी सविस्तर चर्चा करून सार्वजनिक प्रश्न जाणून घेतले. आगामी काळात तालुक्यातील गावे टँकर मुक्त करण्याचा संकल्प केला. सार्वजनिक रस्त्यांचे वाद तडजोडी ने मार्गी लावण्याचे ग्रामपंचायतींनी पुढाकार घेण्याची अपेक्षा व्यक्त केली.

सदरील उपक्रम यशस्वी करण्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे, नि. उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसिलदार दिनेश राजपूत, दिलीपकुमार सोनावणे, श्रावण उगले, अनिल शिंदे, विकास जाधव, रंजना कल्याणकर, जे.बी. लोखंडे, शिवाजी भाग्यवंत, संजय काथार, पांडुरंग सुरवसे, ग्राम महसूल अधिकारी संघटना अध्यक्ष बाळू घटे, सचिव तुकाराम सपकाळ यांनी परिश्रम घेतले.

## शेत वहीवाटीमध्ये वाहन वापरानुसार रस्ता : महसूल मंत्री बावनकुळे



**मुंबई :** यांत्रिकीकरणामुळे सध्या शेत वहीवाटीमध्ये मोठ्या वाहनांचा वापर होत असल्याने वाहन प्रकारानुसार शेत जमीन वहिवाट रस्ता बनवण्याबाबत तहसीलदारांना निर्णय घेता यावा यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात याव्यात, अशा सूचना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या.

शेतजमिनीच्या खरेदी विक्रीच्या दस्त नोंदणी मध्ये शेत रस्त्याचा समावेश बंधनकारक करणे व शेत रस्त्यांच्या नोंदणी 7/12 इतर हक्कात करण्याबाबत महसूल मंत्री यांच्या दालनात बैठक झाली. वित्त नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय आणि कामगार राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आमदार अभिमन्यू पवार, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेशकुमार, सहसचिव अजित देशमुख यावेळी उपस्थित होते.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, शासनाने शेत रस्त्यांचे वर्गीकरण केले आहे. त्यानुसार जे रस्ते अस्तित्वात आहेत त्यांना क्रमांक देण्यात यावेत. शेतजमीनमध्ये वहिवाट करण्यासाठी अस्तित्वात असलेले रस्ते काही ठिकाणी अरुंद आहेत. अशा ठिकाणी मोठी वाहने जाण्यास अडचण निर्माण होऊन तक्रारही होतात. शेत वहिवाट रस्त्याची तक्रार सुनावणी तहसीलदार यांच्याकडे होते. त्यानंतर त्यावर थेट अपील उच्च न्यायालयात केले जाते. थेट अपील होण्यापूर्वी अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील करता यावे यासाठी एक स्टेप मध्ये असणे आवश्यक असून त्यानुसार नियमात सुधारणा करण्यात याव्यात अशा सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

## वाल्मीकच्या समर्थनार्थ आंदोलन, ५ गुन्हे दाखल

**बीड** - कराडवर मकोका लावल्यानंतरमंगळवारी परळी व केज तालुक्यातयाचे पडसाद उमटले होते. कराडच्यासमर्थनार्थ आंदोलन करून रस्त्यावरटायर जाळण्यात आले होते, तर एकाबसवर दगडफेकही केली होती.

याप्रकरणी अज्ञातांविरोधात पाच गुन्हेनोंद करण्यात आले आहेत. कराडवर मकोका लावल्याचीमाहिती मिळताच परळी शहरात याचेपडसाद उमटले.

कराड समर्थकआक्रमक झाले होते. त्यांनी आंदोलनसुरू केले होते.

पांगरी कॅम्प भागातवाण नदी पुलावर व टोकवाडी येथेरस्त्यावर टायर जाळले गेले होते.याप्रकरणी परळी ग्रामीण पोलिसांतपोलिस कर्मचारी विष्णू घुगे यांच्यातक्रारीवरून अज्ञातांविरोधात गुन्हानोंद करण्यात आला.

## सोशल मीडियाचा वापर करून भारतीय जनता पक्षाचे सदस्य व्हा..... शरण बसवराज पाटील




**मुरूम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भारतीय जनता पक्ष हा देशात सर्वात मोठा पक्ष असून जगात सर्वात जास्त सदस्य संख्या या पक्षाची आहे. त्यामुळे उमरगा-लोहारा तालुक्यातून जास्तीत जास्त सदस्यता नोंदणी करावी, असे प्रतिपादन शरण बसवराज पाटील यांनी केले.

मुरूम येथील माधवराव पाटील महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात गुरुवारी (ता. १६) रोजी आयोजित भाजपा सदस्यता नोंदणी महा अभियान प्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर, माजी जिल्हा परिषद सदस्य रफिक तांबोळी, माजी पंचायत समिती सभापती सचिन पाटील, नाईकनगरचे सरपंच योगेश राठोड, रितेश जाधव, गौस शेख, सुजित शेळके, अप्पू गुंजोटे आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी योगेश राठोड, सचिन पाटील, रफिक तांबोळी, अरबाज शेख, निर्मलकुमार लिमये यांनी मनोगत व्यक्त केले.

डॉ. श्रीराम पेठकर म्हणाले की, सध्या सर्वांकडे स्मार्टफोन आहे. त्यामुळे फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सअप या सोशल मीडियाचा वापर करून पक्ष वाढीसाठी प्रयत्न करावेत. प्रत्येक युवक हा भारतीय जनता पक्षाचा सदस्य झाला पाहिजे यासाठी प्रयत्न करावेत. पुढे बोलताना शरण पाटील म्हणाले की, आम्ही सदस्यता नोंदणीचा प्रचार-प्रसार करण्यासाठी उमरगा-लोहारा तालुक्यात डिजिटल फलक लावण्यात आलेले व्हॅन पाठवत आहोत. तेव्हा तरुणांनी यात सहभागी होऊन हे अभियान गावागावात राबवावे. संपूर्ण महाराष्ट्रात उमरगा-लोहारा तालुक्यातून जास्तीत जास्त सदस्य करावेत.

याचा फायदा नक्कीच येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत होईल. 8800002024 या क्रमांकावर मिस्ड कॉल करा व सदस्य नोंदणी करा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. हे अभियान यशस्वी करण्यासाठी विशाल कालेकर, ओम चव्हाण, जगदीश बनसोडे, रुद्र वेदपाठक, यश राठोड, शुभम चव्हाण, प्रवीण चव्हाण, नितीन पवार, अभय पाटील, हर्ष जाधव, आलिम मुजावर, वाशिम शेख, यश चव्हाण, विवेकानंद चौधरी, किशोर कारभारी, अमोल कटके, भूषण पातळे, प्रशांत बेंडकाळे आदींनी पुढाकार घेतला. यावेळी उमरगा-लोहारा तालुक्यातील युवक-युवती बहुसंख्येने उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अशोक सपाटे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले यांनी तर आभार राजूभाई मुल्ला यांनी मानले. फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील माधवराव पाटील महाविद्यालयात भाजप सदस्य नोंदणी अभियानाप्रसंगी शरण पाटील बोलताना अशोक सपाटे, श्रीराम पेठकर व अन्य पदाधिकारी.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १७ जानेवारी २०२५


# डिग्गी विरभद्रेश्वर यात्रा महोत्सव उत्साहात संपन्न



**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले):** तालुक्यातील डिग्गी येथील ग्रामदेवत विरभद्रेश्वर मंदिर यात्रा महोत्सवानिमित्त दोन दिवस विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बुधवारी (ता.१५) रोजी ग्रामदेवत विरभद्रेश्वर लग्न अक्षता सोहळा श्री ची भव्य मिरवणूक व अग्नीप्रवेश झाला. मंगळवारी (ता. १६) रोजी भव्य कुस्त्यांच्या फडाने यात्रेची सांगता झाली. महाराष्ट्रासह कर्नाटकातील हजारो भाविक यात्रेत सहभागी झाले होते.

तालुक्यातील डिग्गी गाव हे महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात वसले असून ग्रामदेवत विरभद्रेश्वर यात्रेनिमित्त मकर संक्रांतीनंतर दोन दिवस प्रतिवर्षी भव्य यात्रा भरते या यात्रा महोत्सवात विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम घेण्यात येतात. मंगळवारी (ता. १४) रोजी मकर संक्रांतीपासून यात्रा महोत्सवाला सुरूवात होते.

बुधवारी सकाळी भद्रकाळी लग्नसोहळ्यानंतर दुपारी श्रीच्या पालखी आणि काठीच्या भव्य मिरवणूकीत गाव, परिसरातील हजारो भाविकांनी यावेळी अग्नीप्रवेश केला. सायंकाळी सहा वाजता मानाच्या रथाची मिरवणूकीने प्रदक्षिणा झाल्यानंतर फटाक्यांची आतषबाजी करून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. गुरुवारी दुपारी तीन वाजता कुस्त्यांचा फड रंगला व यात्रेची सांगता झाली.

वीरभद्रेश्वर हे भगवान शंकराच्या उग्र अवातरापैकी एक असल्याचे अनेक उल्लेख शिवमहापुराणात सापडतात. भगवान शंकर हे अतिप्राचीन दैवत, याची नावे व रूपेही अनेक आहेत. जगाच्या अनेक भागात महादेवाचे अस्तित्व अनेक ठिकाणी सापडते. शिवपुराणातील कथेनुसार दक्ष प्रजापतीच्या यज्ञात माता सतीने उडी टाकली हे कळताच क्रोधित झालेल्या महादेवाने आपल्या जटा जमिनीवर आपटल्या तेव्हा त्यातून वीरभद्रेश्वराचा अवतार झाला.

त्याने दक्षाचा वध केला अशी कथा आहे. दक्ष प्रजापतीच्या यज्ञात वीरभद्रेश्वराने मोठा पराक्रम गाजविला. वीरभद्रेश्वराची देशात अनेक मंदिरे आहेत.यात्रा उत्सवामध्ये धार्मिक व सांस्कृतीक कार्यक्रम संपन्न झाले. यात्रेत बाळ गोपाळांसाठी अनेक खेळण्या आल्या होत्या. यात्रेनिमीत्त मोठा बाजारपेठ सजला होतो. अनेक महिला त्यांच्या साहीत्याची खरेदी करीत होते.

उमरगा-लोहारा तालुक्याचे नुतन आमदार तथा डिग्गी गावचे भुमीपुत्र प्रविण स्वामी यांच्यासह मंदीर समितीचे अध्यक्ष सिध्दाराम कवठे, यात्रा कमीटीचे अध्यक्ष युवराज कर्पे, सरपंच आशाताई लिंबारे, उपसरपंच संतोष कवठे, वामन गायकवाड, सुनील बालकुंदे, रविंद्र गायकवाड, दयानंद स्वामी, पुणेकर ग्रुपचे अध्यक्ष सचिन हेबळ, उपाध्यक्ष विरेंद्र पाटील, दिनकर गायकवाड, मधुकर गायकवाड, विनोद गायकवाड, सामाजीक कार्यकर्ते गुरुनाथ मंठाळे, अप्पाराव पाटील, राहुल कवठे, सिध्दाराम पाटील, शिवकुमार स्वामी, शिवानंद पाटील, डॉ. प्रदीप शिंदे, बालाजी पाटील, नागनाथ तडकले, शांतप्पा कवठे, राजु कुलकर्णी आदींनी यात्रेच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# नविन पिढीला शिक्षणासोबत संस्काराची गरज - शरण पाटील




**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले):** आपल्याला कोणत्याही क्षेत्रात यश संपादन करण्यासाठी उत्तम शिक्षण व सुसंस्काराची गरज आहे. आई वडीलांसह शिक्षकांच्या हातुनच हे पवित्र कार्य होऊ शकते असे मत उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन शरण पाटील यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील डिग्गी येथे मंगळवारी (ता. १४) रोजी महात्मा गांधी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या वतीने शिक्षकांचा सत्कार व कृतज्ञता सोहळा आयोजीत करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.

महात्मा गांधी विद्यालयाचे सचिव संजय डिग्गीकर अध्यक्षस्थानी होते.पंचायत समितीचे माजी सभापती सचिन पाटील, महात्मा गांधी विद्यालयाचे सचिव संजय डिग्गीकर, संचालक प्रा. युसुफ मुल्ला, विठ्ठलसाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक राजीव हेबळे, प्रा. शौकत पटेल, माजी नगरसेवक महेश माशाळकर, माजी सरपंच सिद्धाराम कवठे, योगेश राठोड, विजेता ॲकॅडमीचे संचालक सतीश जाधव, पुणेकर ग्रुपचे अध्यक्ष सचिन हेबळे, उपाध्यक्ष विरेंद्र पाटील, उपसरपंच युवराज कर्पे उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री. पाटील म्हणाले की, युवकांनी आपल्या कर्तत्वाने व्यवसाय सुरू करून प्रगती करण्याचे आवाहन केले.राजेंद्र चापाले, डी. वाय.माने, मुख्याध्यापक सुधाकर बिराजदार, के.एम. माने, बसवराज हावशेट्टे, अशोक घोडके, किसन साखरे, दिलीप सुरवसे, संतोष पाटील, आशिष चौधरी, अशोक पावडशेट्टी, कमलाकर एकंबे आदी शिक्षकांचा कृतज्ञता प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रा. शौकत पटेल, सतीष जाधव यांची भाषणे झाली. प्रा. युसुफ मुल्ला यांनी प्रास्ताविक केले. युवराज गायकवाड यांनी सुत्रसंचलन केले. विरेंद्र पाटील यांनी आभार मानले. महाविर माशाळे, विजयानंद पाटील, प्रदीप कोकळे, सोमनाथ महाजन, भिमाशंकर पाटील, रामलिंग स्वामी, लिंगराज स्वामी, मल्लिकार्जुन पावडशेट्टी, राहुल हेबळे, अमित हेबळे, राहुल कवठे, ॲड.फिरोज मुल्ला, महेश हेबळे, विरेश जमादार, गुरूनाथ मंठाळे आदींनी यासाठी पुढाकार घेतला.

# दिल्ली विधानसभेसाठी राष्ट्रवादीच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर



**मुंबई** - राष्ट्रवादी काँग्रेसने दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी आपल्या स्टार प्रचारकांची यादी जाहिर केली आहे. त्यात उपमुख्यमंत्री अजित पवार, त्यांचे सुपुत्र पार्थ पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल, ब्रीज मोहन श्रीवास्तव, सुबोध मोहिते, अविनाश अदिक, संजय प्रजापती, उमाशंकर यादव, धीरज शर्मा, चैतन्य मानकर, विरेंद्र सिंग, दिपाली अरोरा आदी २० नेत्यांच्या नावांचा समावेश आहे.

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी उद्यापासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात होणार आहे. १८ जानेवारीला उमेदवारांच्या अर्जाची छाननी होईल. त्यानंतर २० जानेवारीपर्यंत उमेदवारांना आपले अर्ज मागे घेता येईल. त्यानंतर ५ फेब्रुवारी रोजी मतदान, तर ८ फेब्रुवारी रोजी निवडणुकीचा निकाल लागणार आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com